# महिला सक्षमीकरणामधील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका व योगदान

**सतिशकुमार दामोधर काळबेंडे** संशोधक मो. ९८६९०१३८६९

---

**सारांश**

महिला सक्षमीकरण ही संकल्पना फार चांगली असली तरी तिला कायमस्वरूपी पुरुषप्रधान संस्कृतीने मागे टाकण्याचा प्रयत्न झालेला आहे. आपल्या भारत देशामध्ये मनूस्मृती काळापासून स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात आले आहे. ब्रिटिश सरकार, महात्मा ज्योतिबा फुले, राजाराम मोहन रॉय, गोपाल गणेश आगरकर तसेच इतरही महापुरुषांनी आपापल्या परीने प्रयास केले. परंतु भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आधुनिक भारतामध्ये स्त्री शिक्षण तसेच सक्षमीकरणामध्ये फारच लक्षणीय आणि महत्वपूर्ण भूमिका बजावल्याचे दिसून येते. त्यांनी या संकल्पनेला कायदेशीर अधिष्ठान प्राप्त करून दिले.

**संशोधन मध्ये वापरले जाणारे मुख्य शब्द : (key words)**

महिला सक्षमीकरण, डॉ बाबासाहेब आंबेडकर, हिंदू कोड बिल, भूमिका, योगदान

**प्रस्तावना**

महिला सक्षमीकरण ह्या संकल्पनेला जे एक वेगळे वलय निर्माण झाले आणि भारतीय महिलांना जो एक समानतेचा सामाजिक दर्जा प्राप्त झाला त्याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जाते. त्यांनी केलेल्या प्रत्येक भाषण, चळवळी, मनुस्मृति दहन, लढलेले न्यायालयीन खटले, मुंबई विधी मंडळामध्ये संतती नियमन विधेयक प्रस्तुत करणे, ब्रिटिश सरकारच्या मंत्रिमंडळामध्ये श्रम आणि नियोजन मंत्री म्हणून स्त्री विषयक सुधारणा लागू करणे, प्रसूती रजा, समानतेचा अधिकार, समान कामासाठी समान वेतन, मुलांसाठी पाळणाघर यांसारख्या महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या.

महिला सक्षमीकरण हा नेहमीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा, चिंतेचा आणि मध्यवर्ती विचार राहिला आहे. त्यांच्या मते, “मला त्या राष्ट्रातील महिलांच्या प्रगतीनुसार राष्ट्राची प्रगती दिसते.” देशाच्या विकासासाठी महिलांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांचे मत होते. त्या दृष्टिकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री म्हणून त्यांनी स्त्रियांना अधिकार मिळावेत यासाठी हिंदू कोड बिल संसदेत मांडले, मात्र ते पारित न झाल्यामुळे त्यांनी राजीनामा दिला. तसेच, 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' च्या माध्यमातून त्यांनी मुलींसाठी विशेष बससेवेची व्यवस्था केली. महान समाज सुधारक डॉ रघुनाथ धोंडो कर्वे यांच्या कार्याला पाठिंबा देत त्यांच्या न्यायालयीन खटल्याची बाजूही लढवली. या सर्व बाबींच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची महिला सक्षमीकरणामध्ये असलेली विशेष आणि महत्वपूर्ण भूमिका अधोरेखित करण्याचा हा संशोधन पेपर प्रयत्न करतो.

**संशोधन पद्धती:**

**संशोधनाचे उद्देश:**

- महिला सक्षमीकरण मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका व योगदान यांचा अभ्यास करणे .
- डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महिला संबलिकरण तथा सक्षमीकरण या विषयावरील विचारांची आजच्या समाजातील उपयुक्तता तपासणे.
- महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या कायदेशीर सुधारणां त्याच प्रमाणे उपाययोजना यांचा अभ्यास करणे.
- शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातील बदलांचा आढावा घेणे.
- डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या अंमलबजावणीसाठी पुढील दिशा निश्चित करणे.

**साहित्य समीक्षण ( Review of Literature )** : डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन, ग्रंथ, संशोधन पेपर आणि विविध शैक्षणिक स्त्रोतांचा अभ्यास.महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ संपदा .

ऐतिहासिक विश्लेषण: महिलांच्या सक्षमीकरणातील आंबेडकरांच्या कार्याचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास.

प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन : भारतीय संविधानातील तरतुदी, विविध ग्रंथ, कायदे आणि अभ्यासक्रमांचा संदर्भ घेऊन विश्लेषण करणे.

तुलनात्मक विश्लेषण: डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या महिला सक्षमीकरणासंबंधी योगदानाची इतर सामाजिक सुधारकांच्या विचारांशी तुलना करणे.

**नियमित संशोधन पद्धती: तथ्य संकलन आणि त्याचे तर्कसंगत विश्लेषण.**

महिला सक्षमीकरणाची संकल्पना:

व्याख्या : महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय दृष्टिकोनातून सक्षम बनविणे. समान अधिकार, स्वातंत्र्य, शिक्षण आणि न्याय यांचा यात समावेश होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले आणि अनेक कायदेशीर सुधारणा सुचविल्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला सक्षमीकरणातील योगदान

शैक्षणिक सुधारणा

- डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांनी शिक्षण घ्यावे यासाठी त्यांनी जोर दिला.त्यासाठी त्यांनी स्वतः स्थापन केलेल्या द पीपल्स एजुकेशन सोसायटी ची स्थापना केली . आणि आपल्या संस्थे मार्फत सिद्धार्थ कॉलेज, मिलिंद महाविद्यालय या महाविद्यालयांची स्थापना केली. तसेच त्यांनी महिलाना शिक्षण घेता यावे म्हणून विशेष बसची सेवा पुरविली होती .
- आपल्या सर्व दुखाचे करण अज्ञान आहे आणि त्यावर शिक्षणदवारेच मात करू शकतो म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या माध्यमातून महिलांनी आत्मनिर्भर होण्याचे आवाहन केले.
- डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रकाशित केलेल्या "मूकनायक" आणि "बहिष्कृत भारत" सारख्या पत्रांद्वारे शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.
- मुंबई विधी मंडळात त्यांनी शिक्षण या विषयावर आपले विचार मांडले आहेत. त्यामध्ये स्त्रीयांना सह-शिक्षण याचे समर्थन केले आहे.

सामाजिक सुधारणा

- डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी महिलांच्या हक्कांवर भर दिला.
- डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी कायदा मंत्री तसेच एक विख्यात बॅरिस्टर म्हणून विवाहसंबंधी कायद्यांमध्ये सुधारणा सुचवली.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यानी दिनांक २८ जुलै १९२८ रोजी मुंबई विधी मंडळात"प्रसूती लाभ विधेयक" या विधेयकावर आपले प्रभावी विचार आणि मते प्रतिपादित केले.अ) प्रसूती पूर्व काळामध्ये आणि त्यानंतर सुद्धा आईला काही प्रमाणात विश्रांती मिळाली पाहिजे. ब)लोकांच्या कल्याणाचे संरक्षण करणे हे शासनाचे प्राथमिक कार्य आहे. क) प्रसुतीलाभाच्या काही बाबतीत शासनावर दायित्व घ्यायला पाहिजे. ड) ज्या लाभांचा पुनर्विचार या विधेयकाने केलेला आहे ते लाभ विधान मंडळाने या इलाख्यातील कारखान्यामद्धे काम करणा ऱ्या गरीब महिलाना द्यावेत.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वतीने दिनांक १० नोव्हेंबर १९३८ रोजी श्री प्रभाकर जनार्दन रोहम यांनी मुंबई विधी मंडळा मध्ये एक क्रांतिकारी ठराव मांडला . तो ठराव खालील प्रमाणे "ही विधानसभा शासनाला शिफारस करीत आहे की, कुटुंब घटकांना मर्यादा घालण्याची तातडीची गरज लक्षात घेवून शासनाने या प्रांताच्या जनतेमध्ये संतति नियमनाच्या बाजूने संघन प्रचार केला पाहिजे आणि संतति नियमन करण्यासाठी पुरेशा सुविधा पुरविल्या पाहिजेत." हा ठराव फार क्रांतिकारक आणि वादातीत ठरला. हा ठराव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फारच अभ्यासपूर्ण आणि काळाच्या १०० वर्ष पुढचा विचार करून तसेच भारतीय महिलांचा सरासर आणि समग्र परिस्थितीचा मागोवा घेवून हा ठराव आपले एक सहकारी श्री प्रभाकर जनार्दन रोहम यांना मांडायला सांगितला. तो ठराव आणि त्यावरचे भाषण त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत होते त्याच प्रमाणे केले.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वात जास्त परिश्रम घेवून आपल्या प्रकृतीची तमा न बाळगता सतत चार वर्षे एक महिना २६ दिवस सतत अविरत परिश्रम घेवून हिंदू कोड बिल सादर करून स्त्रियांना समान वारसाहक्क, घटस्फोटाचा अधिकार आणि स्वतंत्र अस्तित्व प्रदान केले.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मंजूर पक्षातर्फे मुंबई विधी मंडळात संतती नियमन विधेयक मांडले .

आर्थिक सुधारणा

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब्रिटिश वाइसरॉय सरकार मध्ये श्रम विभागाचे मंत्री म्हणून काम करीत असताना जानेवारी १९४४ मध्ये कोळसा खाणीतील कामगारांच्या कल्याणाकरिता एक फंड निर्माण करण्याचा आदेश काढण्यात आला . त्या संबंधित नेमण्यात येणाऱ्या सल्लागार मंडळावर प्रथमच महिला प्रतिनिधीची नेमणूक

करण्याचे ठरविले. त्याचप्रमाणे फेब्रुवारी १९४४ मध्ये कोळसा खाणीतील स्त्री मजूराना पुरुषा प्रमाणे मजूरी देणारा आदेश दिला .महिलांना कामाच्या ठिकाणी समान वेतन आणि सुरक्षित वातावरण मिळावे यासाठी प्रयत्न केले.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खाणीतील कामगार महिलांच्या बाळंतपणाच्या रजे संबंधी महत्वाचे विधेयक मार्च १९४५ मध्ये मंजूर करून घेतले व कायद्यात सुधारणा करून महिला कामगारांसाठी प्रसूती रजा आणि इतर सुविधा लागू केल्या.
- कलम ३९, ४२ आणि ४३ यासह निर्देशक तत्त्वे आर्थिक न्याय, समान वेतन आणि मातृत्वादरम्यान समर्थनाचे समर्थन करतात. शिवाय, कलम ५१अ(ई) महिलांच्या प्रतिष्ठेला अपमानजनक पद्धतींचा त्याग करण्याच्या नैतिक कर्तव्यावर भर देते.

राजकीय सक्षमीकरण

- हिंदू कोड बिल : स्वतंत्र भारताचे प्रथम कायदा मंत्री म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकरांची इच्छा होती की भारत वर्षातील संपूर्ण स्त्रियांना जाचक रूढी आणि परंपरा मधून मुक्त करावे आणि एक भारतीय तसेच देशाचा कायदेमंत्री म्हणून आपले कर्तव्य आहे असे समजून स्वतःच्या प्रकृतीची तमा न बाळगता १९४७ पासून सतत ४ वर्षे १ महिना आणि २६ दिवस डॉ बाबासाहेबांनी अविरत कष्ट करून हिंदू कोड बिल तयार केले आणि २४ फेब्रुवारी १९४९ रोजी संसदेत मांडले. स्त्रियांना कायद्याने हक्क, दर्जे आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे एक आशा त्यांनी बाळगली होती. हे बिल सात वेगवेगळ्या घटकांशी निगडीत कायद्याचे कलमात रूपांतर करणारे होते. ते सात घटक पुढील प्रमाणे- १) जी व्यक्ति मृत्यू पत्र न करता मृत पावली असेल अशा मृत हिंदू व्यक्तीच्या (स्त्री आणि पुरुष दोघांच्याही) हक्काबाबत. २) मृताचा वारसदार ठरवण्याचा अधिकार ३) पोटगी ४) विवाह ५) घटस्फोट ६) दत्तक विधान ७) अज्ञानत्व व पालकत्व .

समाजातील समानतेचे सकारात्मक बदल जे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले. सुधारनेच्या युगात सुद्धा स्त्रियांना समान हक्क द्यायला कुणीही पुढाकार न घेतल्यामुळे हे बिल पारित झाले नाही. सरते शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २७ सप्टेंबर १९५१ रोजी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. पुढे चालून हे बिल तुकड्या तुकड्या मध्ये पारित झाले.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधान सभेत मसुदा समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी आपले सर्व कौशल्य पणाला लावून सतत २ वर्ष ११ महीने आणि १७ दिवस अविश्रांत मेहनत घेवून हे संविधान देशाला अर्पण केले. भारताचे संविधानहे एक सर्व व्यापक दस्तऐवज आहे जे नागरिकांच्या आशा आणि आकांक्षा व्यक्त करते, प्रशासनाची चौकट आणि लोकांच्या मूलभूत हक्क आणि कर्तव्यांची रूपरेषा स्पष्ट करते. त्यातील अनेक तरतुदींपैकी, भारतीय संविधानाने लिंग समानता सुनिश्चित करणे आणि महिला सक्षमीकरणासाठी एक मजबूत चौकटतयार केली आहे.
- भारतीय संविधानात महिलांना मताधिकार आणि समान हक्क मिळवून दिले.

भारतीय संविधानाच्या कलम १४ नुसार : सर्व पुरुष आणि महिलांना कायद्यासमोर समानता आणि कायद्याचे समान संरक्षण दिले आहे. लिंगभेद न करता सर्वांना न्याय आणि समानता प्रदान करण्यासाठी हे दोन्ही शब्द महत्त्वाचे आहेत. त्याचप्रमाणे महिलांच्या हक्कांच्या बाबतीत सर्वात महत्त्वाची तरतूद म्हणजे भारतीय संविधानाचा कलम १५(३). त्यात महिलांसाठी विशेष तरतूद आहे. याशिवाय, सर्व महिलांना जीवनाचा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार, भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य, हालचालीचे स्वातंत्र्य, व्यापाराचे स्वातंत्र्य, राहण्याचे आणि फिरण्याचे स्वातंत्र्य, एकत्र येण्याचे स्वातंत्र्य इत्यादी अधिकार प्रदान केले आहेत.

राजकीय सहभाग वाढवण्यासाठी महिलांना आरक्षणाची संकल्पना मांडली.घटनात्मक सुधारणांमुळे पंचायत आणि नगरपालिकांमध्ये जागा राखीव ठेवून स्थानिक प्रशासनात महिलांचा सहभाग सुलभ झाला आहे, ज्यामुळे महिलांचे प्रतिनिधित्व आणि निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढवण्याची वचनबद्धता अधोरेखित झाली आहे. या तरतुदी एकत्रितपणे भारतातील महिलांचे हक्क आणि दर्जा वाढवण्यासाठी एक मजबूत चौकट तयार करतात.

न्यायालयीन संघर्ष (कायदेविषयक)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एक बॅरिस्टर म्हणून समाजातील महिलांचे खटले अतिशय प्रभावी पणे लढून त्यांना न्याय मिळवून देण्याचा कसोशीने प्रयत्न केला. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जे न्यायालयीन खटले लढले त्यात प्रामुख्याने :-

पुण्यातील ब्राह्मण विधवा प्रकरण (केशवपण) : समाजामध्ये त्या काळी केशवपण सारख्या अमानवी प्रथा अस्तित्वात होत्या. मुख्यत्वे ब्राह्मण वर्गीय लोक ही प्रथा फार कडकपणे पाळीत असत. अश्याच एका विधवा ब्राह्मण स्त्रीने केशवपणाला

नकार दिला. त्यावेळी पुण्यातील सनातनी ब्राह्मण कुटुंबानी त्या स्त्री विरुद्ध न्यायालयात खटला दाखल केला. पुण्यातील सुधारणावादी ब्रह्मणाना माहीत होते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रकरण चांगल्या प्रकारे हाताळू शकतील आणि त्या विधवा ब्राह्मण स्त्रीला न्याय मिळवून देतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ही केस अशा प्रकारे युक्तिवाद करून फिरविली की, त्या ब्राह्मण स्त्री च्या वतीने त्या केसचा निकाल लागला. आपल्या युक्तिवादामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथांचा खरपूस समाचार घेवून त्या कशा अमानवी आहेत हे कोर्टाला सांगितले. त्याच प्रमाणे दूसरा आणि महत्वाचा लक्षणीय युक्तिवाद असा मांडला की, जन्मापासून ते लग्न होईपर्यंत तिच्या केसांवर हक्क माहेरचा आणि लग्न ते विधवा होई पर्यन्त सासरचा. लग्न ते विधवा हा काळ जो आहे त्या कालावधी दरम्यान जी केसांची वाढ झाली असेल तेवढे केस कापून द्यायला परवानगी दिली. हा अद्वितीय आणि अनपेक्षित करणारा युक्तिवाद ऐकून न्यायमूर्ती संहित न्यायालयातील मंडळी मंत्रमुग्ध होवून आवक झाली. डॉ. आंबेडकरांनी अश्या रीतीने आपले वकिलीचे कौशल्य पणाला लावून त्या ब्राह्मण विधवा स्त्री ची केशवपणापासून सुटका केली. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी लढलेल्या तसेच न्यायालयीन संघर्षामुळे एक सामाजिक व क्रांतिकारक बदल समाजामध्ये घडून आला.

विधवा विरुद्ध बेस्ट : ही एका मुंबई मधील गरीब विधवेची केस आहे. या विधवेच नवरा बेस्ट मध्ये कामाला होता. जो कर्तव्यावर असताना विजेचा धक्का लागून मरण पावला होता. भरपूर अर्ज, विनंती करून सुद्धा बेस्ट आस्थापणाने त्या विधवेच्या अर्जावर काही लक्ष दिले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्या गरीब विधवा महिलेची केस लढवून तिला न्याय मिळवून दिला. त्या दिवसापासून ती विधवा आणि तिचा मुलगा राज गृहावर फुले व हर घेवून येत असे. केवढे हे सामाजिक कार्य या केस साठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी एक पैसा सुद्धा घेतला नाही. या केसचा सामाजिक परिणाम तर झालाच शिवाय एक नवजीवन मिळाले. तसेच मुंबई येथील अनेक वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रीया शिवाय मुस्लिम गरीब स्त्रीया यांच्या सुद्धा केसेस डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लढल्या आणि त्यांना न्याय मिळवून दिला.

**विषयाचे विश्लेषण**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या प्रयत्नांचे विश्लेषण करताना त्यांच्या कार्याचा व्यापक परिणाम दिसून येतो. त्यांनी सामाजिक आणि कायदेशीर सुधारणांसह महिलांच्या शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीवर भर दिला. त्यांनी केलेल्या न्यायालयीन संघर्षामुळे अनेक महिलांना न्याय मिळाला तसेच अनिष्ट सामाजिक प्रथा संपुष्टात आल्या. भारतीय संविधानात त्यांनी दिलेल्या अधिकारांमुळे महिलांना समान संधी प्राप्त झाल्या, परंतु आजही त्यांची संकल्पना पूर्णतः अमलात आलेली नाही. शिक्षण आणि रोजगाराच्या संधींमध्ये असलेली विषमता, महिला अत्याचाराचे वाढते प्रमाण, आणि राजकीय सहभागाचा अभाव यासारख्या समस्या अद्यापही अस्तित्वात आहेत.त्यामुळे डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची पुनर्रचना करून त्यांची अंमलबजावणी करण्याची गरज आहे. महिलांच्या शैक्षणिक संधी वाढवणे, आर्थिक स्वायत्तता मिळवून देणे, आणि सामाजिक सुरक्षेसाठी प्रभावी धोरणे राबवणे ही बाब महत्त्वाची ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या हिंदू कोड बिलच्या तत्त्वांचा आजही महिलांच्या अधिकारांसाठी उपयोग होऊ शकतो. त्यामुळे त्यांच्या विचारांची प्रासंगिकता आजही तितकीच महत्त्वाची आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या सूचना, उपाय योजना, विधेयक त्या काळात मांडल्या त्या आजही समाजाला मार्गदर्शक आणि प्रेरक असून त्यांचा पूर्ण पणे सकरात्मक विचार केला गेला तर अजूनही महिला सक्षमीकरण नवीन संजीवनी प्राप्त होवू शकते.

वर्तमान कालीन प्रासंगीकता (आजच्या संदर्भात आंबेडकरांचे विचार)

आजही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचवलेल्या अनेक संकल्पनांची अंमलबजावणी आवश्यक आहे. महिलांवरील अन्याय, शिक्षणातील असमानता, आणि रोजगारातील अडथळे यावर तोडगा काढण्यासाठी त्यांच्या विचारांवर आधार घेतला जात आहे.

**निष्कर्ष**

१.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिला सक्षमीकरणासाठी दिलेले योगदान अमूल्य आणि अतुलनीय आहे.

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे महिला सक्षमीकरणाच्या लढयातील संघर्ष योद्धा होते.

३.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळे, त्यांनी केलेल्या विविध कार्यामुळे भारतीय महिलांना शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सक्षमीकरण मिळाले.

४. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आजही प्रेरणादायी आहेत आणि त्यांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

५.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य महिलांच्या सक्षमीकरणासाठी मार्गदर्शक ठरले आहे.

**संदर्भसूची**

१.Shri Vijay Gaikwad : Court Cases argued by Dr. Babasaheb Ambedkar.

२. भारतीय संविधान :भारतीय संविधान, अनुच्छेद 14, 15, 39(d), 42 आणि 51(A).

३. गणवीर रत्नाकर, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल' नागपुर २००४.

४. वसंत मून, ' डॉ . बाबासाहेब आंबेडकर , संचालक नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, न्यू दिल्ली.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे : इंग्रजी खंड २ चा मराठी अनुवाद भाग-१ डॉ बाबासाहेब आंबेडकर – मुंबई विधान मंडळात- सायमन आयोगासोबत– गोलमेज परिषदेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रक्षाण समिति, उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.

६.मनिषा यशवंत शिंदे यांचा संशोधन पेपर :डॉ बाबासाहेब आंबेडकर – महिला सक्षमीकरण

७. सुनीता बंगोत्रा यांचा अर्लि टाइम्स न्यूज पेपर जम्मू काश्मीर– "डॉ.आंबेडकर आणि भारतातील महिला हक्कासाठी त्यांचे योगदान"या विषयावर आलेला लेख.